# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र जिल्हा District: ~~बृहन्~~मुंबई पोलीस ठाणे Police Station: लाप्रवि मुंबई पहिली खबर क्र. FIR No.: 07 वर्ष Year: 2026 दिनांक Date: 24/03/2026

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ............ तारीख पासून Date from: 19.12.2025 वेळ Time: 11.30 ते तारीख पर्यंत Date to: 19.12.2025 वेळ Time: 21.30

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: 19.12.2025 वेळ Time: 11.30

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 21/26 तारीख Date: 24.03.2026 वेळ Time: 12.25

4. माहितीचा प्रकार Type of Information: समक्ष लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ............ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ............

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ............ ठिकाणाचे नंबर No. if any ............ गल्ली Ward ............ रस्त्याचे नाव Name of road ............
५ वा माळा, बी विंग, एम.एस.टी. भवन, बीकेसी वांद्रा, मुंबई ५१
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: सुषमा सुशांत खोत (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: सुशांत खोत

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 19 जून 1990, 36 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय फोन नं. Phone No.: 9130001249

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation ............

(g) धर्म Religion: हिंदू जात Caste: मराठा जनजात Sub-Caste ............

(h) पत्ता Address ............ गल्ली/सर्व्हे नं. Ward ............ घर/नाव नं. House Name No. ............ फोन/मो. नं. Phone No. ............ पॅन नं. Pan No. ............ वोटर्स नं. Card No. ............
फ्लॅट नं 504, A विंग, गुरु आत्मन रेसिडन्सी, योगीधाम कल्याण (प)
रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ पो. स्टे. P. Stn. ............

तालुका Taluka: कल्याण जिल्हा Dist.: ठाणे राज्य State: महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्री. अविनाश ~~मिश्रा~~ धर्मपाल मेश्राम वय 35 वर्षे, पद- राज्यकर निरीक्षक रा.ठी. 201/जी विंग, मातेश्वरी कॉम्प्लेक्स, काकाजींनी वाडीच्या मागे आकुर्ली न्यू पनवेल 410206 मो.नं. 9011837549

फिर्याद

फिर्यादी यांचा स्वतंत्र कागदावर घेण्यात आलेली फिर्याद हिच गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावी.

समक्ष

संदिप पाटील
पोलीस निरीक्षक
लाप्रवि मुंबई.

सुषमा खोत
पोनि लाप्रवि मुंबई.

जबाब दिनांक :- २४/०३/२०२६

श्रीमती सुषमा सुशांत खोत, वय ३६ वर्षे, व्यवसाय-नोकरी, (पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई, वरळी) रा.ठी. ५०४, ए विंग, गुरु आत्मन रेसीडन्सी, योगीधाम कल्याण पश्चिम. मो.क्र. ९१३०००१२४९.

-----------

मी वरीलप्रमाणे असून, नमूद पत्त्यावर माझे कुटुंबासह राहत आहे. मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई वरळी येथे दि. २०/०८/२०२५ रोजी पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक १९/१२/२०२५ रोजी मला तक्रारदार नामे श्रीमती ममता प्रविण कापसे, वय- ४० वर्षे, व्यवसाय :- अंकाउट मॅनेजर, रा.ठी. - जी / १०३, निंबेश्वर सृष्टी, देवदगाव न्यु पनवेल, जि. रायगड पिन क्रंमाक ४१० २०६ मोबाईल नं. ७५०६७९८९६७ यांच्या तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी करून सापळा कारवाई करण्याबाबत वरिष्ठांच्या मार्फतीने आदेशीत करण्यात आले होते.

सदर प्रकरणी तक्रारदार यांच्या मुळ तक्रार अर्जाची पाहणी केली असता, तक्रारदार नामे श्रीमती ममता प्रविण कापसे यांचा दि.१९/१२/२०२५ रोजीचा मा. अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि मुंबई यांच्या नावे दिलेला स्वःहस्तक्षरातील व सही केलेला लेखी तक्रारी अर्ज आहे.

सदर तक्रार अर्जामध्ये त्यांनी तक्रार केली आहे की, तक्रारदार श्रीमती कापसे या कॅलसायंटिफीक इंडिया प्रा.लि. या कंपनीमध्ये अकाउंट मॅनेजर या पदावर कार्यरत असुन त्यांच्या कंपनीमार्फत विविध फार्मा कंपनीना कॅलीब्रेशन सेवा पुरवली जाते. सदर कंपनीच्या आर्थिक व्यवहाराबाबत जी.एस.टी. परतावा प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता जी.एस.टी. भवन बी.के.सी. येथे ऑनलाईन पध्दतीने सादर करीत असतात. जी.एस.टी. भवन येथिल अधिकारी उप आयुक्त, श्री गणेश सावळाराम साबळे यांनी ASMT-10, DRC -01 A, DRC-01 अंतर्गत नोटिस जारी केली होती. नमुद नोटिसीच्या अनुषंगाने आर्थिक वर्षे २०२१-२०२२ साठी रक्कम ५१,८८,१४२/- रूपयांच्या प्रस्तावित व्याजासह ६६,००,०००/- रूपयांचा IN PUT TRM CREDIT [ITC] चा अतिरिक्त वापर केला असल्याबाबतचा आरोप कंपनीवर करण्यात आला आहे. नमुद नोटिशीच्या अनुषंगाने कंपनीमार्फत जीएसटी कार्यालयास कागदपत्रे सादर करण्यात आले होते. सदर कागदपत्राबाबत जी.एस.टि. भवन येथिल अधिकारी असमाधानी असल्याचे तक्रारदार यांना कळवण्यात येवुन जी.एस.टी. भवन, बी.के.सी. येथे तक्रारदार कापसे यांना कागदपत्रासह समक्ष हजर राहण्याबाबत सांगण्यात आले. दिनांक १३/१०/२०२५ रोजी श्रीमती कापसे व कंपनीच्या सी.ए. मनीषा दमानी असे जी.एस.टी. भवन येथे गेले व सर्व कागदपत्रांची तपासणी उप आयुक्त श्री साबळे व राज्यकर निरीक्षक श्री अविनाश मेश्राम यांचे कडुन करण्यात आली. तर त्यांनी सदर बाबत शहानिशा करून पुन्हा कळवितो असे सांगितले. दिनांक ०८/१२/२०२५ रोजी श्री अविनाश यांनी मोबाईल व्दारे टेक्स्ट मेसेज करून श्रीमती कापसे यांना पुन्हा कार्यालयात बोलवण्यात आले. त्यांनतर श्रीमती कापसे व सी.ए. मनिषा दमानी असे जी.एस.टी. कार्यालयात गेल्यावर कागदपत्राची पडताळणी करून कंपनीला व्याजाची व दंडाची रक्कम एकत्र भरावी लागेल असे सांगण्यात आले व त्या सोबत आर.सी.एम. बिलाची कॉपी, सेवा कारारनामा, इत्यादी कंपनीशी संबधित कागदपत्रे तपासावे लागतील असे सांगण्यात आले.

त्यानंतर दि. ११/१२/२०२५ रोजी त्यांनी तक्रारदार कापसे यांना पुन्हा कार्यालयात बोलविले, श्रीमती कापसे हया सदर कार्यालयात गेल्यानंतर आर.सी.एम. बिलाची कॉपी, सेवा करारनामा, उप आयुक्त श्री साबळे व राज्यकर निरीक्षक श्री अविनाश मेश्राम यांना सर्व कागदपत्रे सादर केले. त्यानंतर श्री साबळे आणि श्री अविनाश मेश्राम यांनी तक्रारदार यांना सांगितले की, जर तुम्ही रक्कम १,००,०००/- रूपये दिले तर तक्रारदार यांच्या कंपनीचे आर्थिक वर्षातील व्याजाची रक्कम तसेच दंडाची रक्कम न आकारता तक्रारदार यांच्या कंपनीची फाईल बंद करु असे सांगितले. त्यावर तक्रारदार श्रीमती कापसे यांनी लोकसेवक श्री साबळे व लोकसेवक श्री

मेश्राम यांना सांगितले की, तक्रारदार यांच्या कंपनीच्या मुख्य व्यवस्थापकिय संचालक श्री प्रदिप गंदे यांना सदर बाब सांगुन त्यानंतर कळविते. दिनांक १५/१२/२०२५ रोजी तक्रारदार श्रीमती कापसे पुन्हा जी.एस.टी. भवन येथे जावुन लोकसेवक श्री साबळे व लोकसेवक श्री मेश्राम यांना तक्रारदार यांच्या कंपनीच्या जी.एस.टी परतावाच्या नोटिस संदर्भात विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांना रक्कम १,००,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली. तक्रारदार श्रीमती कापसे यांनी सदर रक्कम १,००,०००/- रू. देण्याबाबत स्पष्ट नकार दिला. त्यावर तक्रारदार श्रीमती कापसे हया पुन्हा जी.एस.टि. भवन येथुन परत आले. नंतर तक्रारदार यांच्या कंपनीच्या कार्यालयातील इमेल आय डी क्र. mamata.k@calscientific.com वर तक्रारदार यांच्या कंपनीची जी.एस.टी. परतावा नोटिस संदर्भातील सन २०२१ व २०२२ चे प्रकरण बंद करण्यात आलेबाबत ईमेल प्राप्त झाला. नमुद ऑर्डर मध्ये व्याजाची व दंडाची रक्कम भरण्याची गरज नसुन तक्रारदार यांच्या कंपनी मार्फत देण्यात आलेल्या नोटिसच्या उत्तराला जी.एस.टी. भवन येथिल अधिकारी लोकसेवक श्री साबळे हे सहमत असल्याबाबत कळविण्यात आले आहे. असे असताना दिनांक १६/१२/२०२५ रोजी लोकसेवक श्री मेश्राम यांनी त्याचे मोबाईल क्र. ९०११८३७५४९ या क्रमांकावरून व्हॉट्स ॲप कॉल करून सांगितले की, तक्रारदार यांच्या कंपनीची फाईल तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात आली असल्याचे सांगून झालेल्या कामाचा अवाजवी फायदा मिळविण्याच्या हेतूने लोकसेवक श्री मेश्राम यांनी तक्रारदार यांच्याकडे मागणी केलेली एक लाख रुपये रक्कम दिनांक १९/१२/२०२५ रोजी पर्यंत आणुन नाही दिली तर तक्रारदार यांच्या कंपनीची फाईल पुन्हा रिओपन होईल व तक्रारदार यांच्या कंपनीला दंडाची व व्याजाची रक्कम भरावी लागेल असे सांगितल्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री मेश्राम यांना सांगितले की, त्यांच्या कंपनीतील वरिष्ठ अधिकारी यांना सदर बाब सांगुन लोकसेवक यांना पुन्हा कार्यालयात भेटण्यास येतील. तक्रारदार यांच्या कंपनीला जी.एस.टि. भवन येथिल वरील अधिकारी यांना नमुद का रणास्तव लाचेची रक्कम १,००,०००/- रूपये देण्याची ईच्छा नसल्याने तक्रारदार श्रीमती कापसे यांनी दिनांक १९/१२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे जी.एस.टी भवन, बी.के.सी. मुंबई येथिल अधिकारी उप आयुक्त श्री गणेश साबळे व राज्यकर निरीक्षक श्री अविनाश मेश्राम यांचे विरुध्द स्व:हस्ताक्षरात लेखी तक्रार केली आहे. तसेच सदर कंपनीचे मुख्य व्यवस्थापकिय अधिकारी श्री.प्रदीप गंदे यांनी ईमेलव्दारे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, येथे तक्रार केलेली आहे. जी.एस.टि. कार्यालयातील अधिकारी श्री गणेश साबळे व श्री. अविनाश मेश्राम यांचे सोबत तक्रारदार श्रीमती ममता कापसे यांचे यापुर्वी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण-घेवाण नाही.

तक्रारदार यांना जी.एस.टी भवन, बी.के.सी. मुंबई येथिल जी.एस.टी. अधिकारी उप आयुक्त श्री. गणेश सावलाराम साबळे व राज्यकर निरीक्षक श्री अविनाश मेश्राम यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष येवून लेखी तक्रार दिली असल्याचे तक्रारी अर्जामध्ये नमुद आहे. सदर तक्रारी अर्जावर पंच व मी स्वत: तपासी अधिकारी पोनि. सुषमा खोत व पर्यवेक्षण अधिकारी सपोआ चंद्रकांत माळी यांच्या सहया आहेत.

तसेच सदर तक्रारी बाबत गोपनिय कामकाजासाठी पर्यवेक्षण अधिकारी, तपासी अधिकारी यांची नेमणुक केल्याबाबत मा. अपर पोलीस आयुक्त,लाप्रवि मुंबई यांचे दि. १९/१२/२०२५ रोजीचे आदेश आहेत. तसेच सदर तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाचे तपासी अधिकारी मी, पर्यवेक्षण अधिकारी सपोआ चंद्रकांत माळी यांनी पोलीस पथक, तक्रारदार व शासकिय पंच यांच्यासोबत दि.१९/१२/२०२५, दि. ०५/०१/२०२६ रोजीचे पडताळणी पंचनाम्यांचा समावेश आहे.

दि. १९/१२/२०२५ रोजीच्या पडताळणी पंचनाम्यावेळी लाच रकमेच्या मागणीच्या अनुषंगाने तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये झालेल्या संभाषणाचा भाग खालील प्रमाणे -

| | |
|---|---|
| तक्रारदार | आहेत सर ? आहेत सर ? (लोकसेवक श्री गणेश साबळे यांचे केबीन बाहेर) |
| लोकसेवक अविनाश | हे कोण आहेत ? |

पोनि. सुषमा खोत यांचा दिनांक २४/०३/२०२६ रोजीचा जबाब पुढे चालु....

| | |
|---|---|
| तक्रारदार | हे असिस्टंट आहेत |
| लोकसेवक अविनाश | आ... |
| तक्रारदार | असिस्टंट आहेत |
| लोकसेवक अविनाश | तुमचे असिस्टंट |
| तक्रारदार | हा |
| लोकसेवक अविनाश | पाच मिनटं थांबा, हॉस्पीटलला कोणाला काय प्रॉब्लेम झालता, |
| तक्रारदार | माझ्या मुलीला प्रॉब्लेम झाला होता |
| लोकसेवक अविनाश | आता घरी गेले का ? शिफ्ट झाले का ? |
| तक्रारदार | आं |
| लोकसेवक अविनाश | घरी गेले का हॉस्पीटललाच आहे ? |
| तक्रारदार | आता घरी |
| लोकसेवक अविनाश | घरी आहे ना ? |
| तक्रारदार | हं |
| तक्रारदार | संभाषण चालु...<br>चला बोलवलय (पंच श्री मनोज माळी यांना उद्देशून) |
| लोकसेवक अविनाश | मॅडम एकटेच या |
| तक्रारदार | एकटीच येवु? ...... एकटेच यायला सांगतायत |
| लोकसेवक अविनाश | आप बाहर बैठो ( पंच श्री मनोज माळी यांना उद्देशून)<br>(तक्रारदार व लोकसेवक अविनाश असे दोघांनी लोकसेवक गणेश यांचे केबीन मध्ये प्रवेश केला) |
| लोकसेवक गणेश | हा मॅडम |
| तक्रारदार | सर तुमची ऑर्डर मिळाली आम्हाला |
| लोकसेवक गणेश | हा |
| तक्रारदार | बाकी ट्वेंन्टी वन ट्वेंन्टी टु, ट्वेंन्टी थ्री च पण असणार आहे ना आपल्याकडे |
| लोकसेवक गणेश | हा |
| तक्रारदार | सर, तर ते तुम्ही म्हणले होते ना ते सर अॅग्री नाही झालेत अजुन |
| लोकसेवक गणेश | मॅडम आता हा विषय तुमचे सिए असतील ना तेव्हाच या तुम्ही |
| तक्रारदार | ती आता त्यांना खुप वेळ लागणार आहे यायला |
| लोकसेवक गणेश | मग |
| तक्रारदार | सर ते तोपर्यत ते पेंडींगच राहिल ना, सर म्हणजे तीस म्हणत होते |
| लोकसेवक गणेश | मॅडम! काही शब्द काढु नका तुम्ही तोंडातून |
| तक्रारदार | तीस तरी म्हटलं? |
| लोकसेवक गणेश | मॅडम! हे आता काय झालय, तुमचे सीए कधी येणार आहेत ? |
| तक्रारदार | सीए ला वेळ आहे अजून, म्हणजे पाच जानेवारी नंतरच येतील |
| लोकसेवक गणेश | ते कोण आहेत तुमचे आता आले ते ? |
| तक्रारदार | ते असिस्टंट आहेत माझे, असिस्टंट आहेत |
| लोकसेवक गणेश | कुणाचे ? |
| तक्रारदार | माझे |
| लोकसेवक गणेश | काय नाव आहे त्यांच ? |
| तक्रारदार | त्यांच मनोज |
| लोकसेवक गणेश | त्यांना का आणलय आता? ते काय कळलं नाय मला |

| | |
|---|---|
| तक्रारदार | सर सर बोलले घेवुन जा सोबत, म्हणुन, कारण की ते अॅग्री होत नाही आहेत त्या गोष्टीला म्हणुन मी म्हटलं, आता माझं कसं दोन (मध्येच लोकसेवक गणेश बोलतात) |
| लोकसेवक गणेश | तुम्हाला ऐकत नाहीत ते (मध्येच तक्रारदार बोलतात) |
| तक्रारदार | दोन्ही बाजुनी ते माझं |
| लोकसेवक गणेश | तुमच काय माझ्याकडे पेंडींग काम नाहीये इथं |
| तक्रारदार | हा, नाही ऑर्डर तर निघालीय, ती जीएसटीची आपली ऑर्डर तर निघाली आहे, फायनलची |
| लोकसेवक गणेश | पेंडन्सी मॅडम आता तशी काय नाही आहे तुमची, खर सांगायच म्हटलं तर |
| तक्रारदार | अविनाश सरांना पण बोलली, म्हटलं गणेश सरांना काहीतरी सांगा |
| लोकसेवक अविनाश | तुम्ही डायरेक्ट बोला म्हणून सांगितलं ना तुम्हाला |
| तक्रारदार | हा ते डायरेक्ट सर म्हणजे काय बोलत नाहीत, |
| लोकसेवक गणेश | अं, ते एक काम करा मॅडम |
| लोकसेवक अविनाश | तुम्हाला बर नाही, तुम्ही घाबरल्यासारख्या दिसता |
| तक्रारदार | कारण की बघा... की, आज माझ... नाही... मला बरं नाही आहे, म्हणुन मी आज ले.. कॅल सायंटिफीकच म्हणजे आता हे येतच राहणार आहे ना, बावीस तेवीस चोवीस पंचवीस, सगळयाचं आहे, तीसमध्ये बघा ना होतय का ? तीस हजार मध्ये तर होत असेल तर |
| लोकसेवक गणेश | मॅडम शब्द ताणु नका तुम्ही |
| लोकसेवक अविनाश | शब्द असे डायरेक्ट... |
| तक्रारदार | अच्छा अच्छा ओके! |
| लोकसेवक गणेश | नका काढु मॅडम, आज डॉक्युमेंट आणलेत का तुम्ही ? |
| तक्रारदार | आज डॉक्यमेंट्स काही नाही आणलेत, म्हणजे सर बोलले की फोन करा मला, मला फोन करा तुमच काय बोलतात |
| लोकसेवक गणेश | दोन मिनटं दोन मिनट बसुन घ्या तुम्ही<br>(तक्रारदार श्रीमती कापसे या लोकसेवक गणेश यांच्या केबीनच्या बाहेर आले.) |
| | काही वेळानंतर<br>(लोकसेवक अविनाश मेश्राम हे लोकसेवक गणेश यांच्या केबीनच्या बाहेर आले.) |
| लोकसेवक अविनाश | त्यांना बसवा (तक्रारदार यांचे सोबत असलेले पंच श्री मनोज माळी यांना उद्देशून तक्रारदार यांना बोलले.) |
| तक्रारदार | आ! |
| लोकसेवक अविनाश | त्यांना बसायला सांगा |
| तक्रारदार | नाही... ते बसलेत तिथेच |
| लोकसेवक अविनाश | काय आणलेत |
| तक्रारदार | आ! |
| लोकसेवक अविनाश | तुम्ही काय आणले का डॉक्युमेंट्स ? |
| तक्रारदार | नाही तुम्ही, असेल तर मी अरेंज करेन ना पण... |
| लोकसेवक अविनाश | तुम्ही तर यासाठीच तर एवढे दिवस मागितले होते ना मॅडम? |
| तक्रारदार | अरे... पण... |
| लोकसेवक अविनाश | तुम्ही फ्रायडेपर्यंत अरेंज करण्यासाठीच मागितले होते ना मॅडम? |
| तक्रारदार | सर नाही आहेत आता, म्हणुन म्हटलं तर... |

पोनि. सुषमा खोत यांचा दिनांक २४/०३/२०२६ रोजीचा जबाब पुढे चालु....

| | |
|---|---|
| लोकसेवक अविनाश | **कशात? म्हणजे काय नाही म्हणता तसं... फिफ्टी करा ना तुम्ही, बोलले मघाशी ना, तेवढं तरी निदान...** |
| तक्रारदार | **तेवढे पैसे नाही आहेत** |
| लोकसेवक अविनाश | तुम्हाला कणकण आहे का ? |
| तक्रारदार | हा मला कणकण आहे... ते तीस चं काय बोलले काय ? सर गेले का ? |
| लोकसेवक अविनाश | आ! |
| तक्रारदार | सर गेले ? |
| लोकसेवक अविनाश | नाही, सर आहेत ना... हे आता काय डॉक्युमेंट तुम्ही घेवुन नाही आले का ? |
| तक्रारदार | नाही, पण मी अरेंज करेन, पाहिजे असेल तर |
| लोकसेवक अविनाश | कधी आता? |
| तक्रारदार | हा |
| लोकसेवक अविनाश | करा |
| तक्रारदार | किती? अमाऊंट तर काय नाही बोलले मला |
| लोकसेवक अविनाश | ते तुमच किती आहे, तुमच्यापाशी बोलता बोलता.... चार डॉक्युमेंटचे बोलले होते |
| तक्रारदार | अच्छा, हा |
| लोकसेवक अविनाश | घ्या करून मग तेवढे... किती वेळ लागेल तुम्हाला ? |
| तक्रारदार | बघते मी... ट्राय करते |
| लोकसेवक अविनाश | आ ? |
| तक्रारदार | ट्राय करते, एवढे नाही आहेत पण |
| लोकसेवक अविनाश | हा |
| तक्रारदार | ठिक आहे |
| लोकसेवक अविनाश | किती ? किती डॉक्युमेंट आहेत मग ? |
| तक्रारदार | **आता माझ्याकडे तेवढे... अं... तीस... तीस डॉक्युमेंट** |
| लोकसेवक अविनाश | **ठिक आहे चालेल, माझं... माझ्या ड्रॉवर आहे तिथे टाकुन द्या टेबल...** |
| तक्रारदार | **तीन...तीस कॅश** |
| लोकसेवक अविनाश | **हं, हा** |
| तक्रारदार | तीस, पण थांबा एवढी कॅश मला अरेंज करायचं ना |
| लोकसेवक अविनाश | कसले शब्द बोलता मॅडम तुम्ही? कसं आम्हाला घाबरायला होत मॅडम |
| तक्रारदार | नाय नाय नाय, ठिक आहे, ठिक आहे मी बघते, ठिक आहे |
| लोकसेवक अविनाश | कस असत मॅडम |
| तक्रारदार | हा |
| लोकसेवक अविनाश | आम्ही, आम्हाला एवढा एक्सपिरीयन्स आहे मी तुम्हाला सांगतो |
| तक्रारदार | हं |
| लोकसेवक अविनाश | आम्ही खुप दिवसापासुन डयुटी करतोय |
| तक्रारदार | हं |
| लोकसेवक अविनाश | आम्ही अँन्टी करप्शनच्या पण डयुटया केलेल्या आहेत, कसं काय लावायचं ते |
| तक्रारदार | हं |
| लोकसेवक अविनाश | कसे कसे ट्रॅप होतात आम्हाला माहिती आहे, असे शब्द वापरूनच ट्रॅप केले जातात |
| तक्रारदार | हं, ठिक आहे |
| लोकसेवक अविनाश | आणि तुम्ही घाबरत आहेत त्याच्यावरून मला पुर्ण डाऊट आहे |
| तक्रारदार | मी तशीच असते नेहमी |

पोनि. सुषमा खोत यांचा दिनांक २४/०३/२०२६ रोजीचा जबाब पुढे चालु....

| | |
|---|---|
| लोकसेवक अविनाश | नाही, तरी पण आज |
| तक्रारदार | तुम्ही पहिल्यांदा पण मला आले का |
| लोकसेवक अविनाश | नाही नाही नाही आज तुम्ही जास्तच भित भित, घाबरलेल्या दिसतात |
| तक्रारदार | नाय नाय |
| लोकसेवक अविनाश | तस नाही ना ते, हं, साहेबांना पण डाऊट आहे, मला पण |
| तक्रारदार | नाही नाही |
| लोकसेवक अविनाश | आ, कारण तुमच्या सीए मध्येच गायब झाल्या |
| तक्रारदार | नाही नाही ते तर हॉलीडे वर जाणारच होते, ते मी तुम्हाला आधीच स्टार्टींग झाल तेव्हाच सांगितलं ना ती हॉलीडे वर जाणार आहे, जेव्हा आपण सुरवात केली तेव्हाच सांगितलं, तेव्हा आपलं ते काय झाल पण नव्हत, माहिती नव्हत, ठिक आहे, ठिक आहे चला मग, मला थोडा वेळ द्या मग मी येते. |
| लोकसेवक अविनाश | ते साहेब जाणार आहेत |
| तक्रारदार | किती वाजता जाणार आहेत सर ? |
| लोकसेवक अविनाश | साहेब जातील आता पंधरा मिनटात |
| तक्रारदार | थांबा आले मी |

दिनांक १९/१२/२०२५ रोजीच्या पडताळणी पंचनाम्यातील झालेल्या संभाषणावरून असे दिसुन आले की, तक्रारदार श्रीमती कापसे हया लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांची पंचासमक्ष प्रत्यक्ष भेटी दरम्यान लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांनी तक्रारदार श्रीमती कापसे हे काम करीत असलेल्या कंपनीच्या जीएसटी परतावा फाईलच्या कामासंदर्भात **''फिफ्टी करा ना तुम्ही, बोलले मघाशी ना, तेवढं तरी निदान''** असे म्हणून रक्कम ५०,०००/- रूपयांची मागणी केली. तसेच तक्रारदार श्रीमती कापसे यांनी इतकी रक्कम त्यांच्याकडे उपलब्ध नसुन तीस हजार इतकी रक्कम असल्याचे लोकसेवक श्री मेश्राम यांना सांगितले त्यावर लोकसेवक श्री मेश्राम यांनी **''ठिक आहे चालेल, माझं... माझ्या..... ड्रॉवर आहे तिथे टाकुन द्या.... टेबल ''** असे म्हणाले. अशा प्रकारे तडजोडी अंती रक्कम ३०,०००/- रूपयांची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले आहे.

वरीलप्रमाणे लोकसेवक यांचेकडून लाचेची मागणी झाल्याने पडताळणी पथकाने सापळापुर्व तसेच सापळा कारवाई करण्याचे आयोजन केले. त्यानुसार तक्रारदार श्रीमती कापसे यांना लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांनी मागणी केलेल्या लाचेच्या ३० हजार रक्कमेला ॲथ्रासीन पावडर लावुन सदरची रक्कम एका पाकिट मध्ये ठेवुन सदरचे पाकिट लोकसेवक श्री मेश्राम यांना देण्याकरीता सरकारी पंच नामे श्री मनोज माळी यांच्यासमक्ष लोकसेवक यांच्या कार्यालयात पाठविण्यात आले त्यावेळी तक्रारदार श्रीमती कापसे व लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांचे मध्ये प्रत्यक्ष भेटी दरम्यानचे संभाषण.

दि.१९/१२/२०२५ रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये झालेल्या संभाषणाचा भाग खालील प्रमाणे -

| | |
|---|---|
| लोकसेवक अविनाश | बसा मॅडम बसा, आवाज देतो तुम्हाला |
| तक्रारदार | हं |
| | काही वेळाने |
| लोकसेवक अविनाश | मॅडम साहेब गेले |
| तक्रारदार | गेले? |
| लोकसेवक अविनाश | तुम्ही पण या नंतर मग कधी, जशी वेळ भेटेल तशी बघा |
| तक्रारदार | सर कधी येणार? |
| लोकसेवक अविनाश | साहेब खालूनच गेले अर्जंटली, त्यांना काहीतरी कॉल आला वाटतं |
| तक्रारदार | तुम्ही बोलला नाहीत त्यांना मी आले ते... आं |

पोनि. सुषमा खोत यांचा दिनांक २४/०३/२०२६ रोजीचा जबाब पुढे चालु....

| | |
|---|---|
| लोकसेवक अविनाश | नाही नाही तुम्ही काही बोलु नका जावा तुम्ही, नंतर बघु |
| तक्रारदार | गणेश, त्यांनी पाहिलं मला पण बोलले नाही काय, गणेश सर, आता म ते जातील ना |
| लोकसेवक अविनाश | आता कॉल आला होता |
| तक्रारदार | हा |
| लोकसेवक अविनाश | ते बोलले की त्यांना जायला सांगा, साहेब बोलले |
| तक्रारदार | म ते आता आठवडाभर सुट्टीवर आहेत ना ? |
| लोकसेवक अविनाश | हो |
| तक्रारदार | मग आल्यावरच |
| लोकसेवक अविनाश | हो हो, |

दि. १९/१२/२०२५ रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान झालेल्या संभाषणावरून असे दिसुन आले की, सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार श्रीमती कापसे व लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांच्या प्रत्यक्ष भेटी दरम्यानच्या संभाषणात '' **बसा मॅडम बसा, आवाज देतो तुम्हाला** '' असे बोलुन बराच वेळ बाहेर बसुन ठेवले व बराचवेळ टेहाळणी करुन त्यांना संशय आल्याने लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांनी '' **मॅडम साहेब गेले. . तुम्ही पण या नंतर मग कधी, जशी वेळ भेटेल तशी बघा... ते बोलले की त्यांना जायला सांगा, साहेब बोलले** '' त्यावर तक्रारदार श्रीमती कापसे या '' **म ते आता आठवडाभर सुट्टीवर** आहेत ना ? ''... असे बोलले असता लोकसेवक श्री अविनाश मेश्राम हे '' **हो** '' त्यावर श्रीमती कापसे हया म्हणाल्या की, '' **आल्यावरच मग** '' अशा प्रकारे सापळा कारवाई दरम्यान संभाषण झाले असुन लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांना संशय आल्याने त्यांनी तडजोडी अंती मागितलेली लाचेची रक्कम ३०,०००/- रूपये स्विकारलेली नाही.

तसेच पडताळणी कारवाई दरम्यानच्या संभाषणात लोकसेवक अविनाश मेश्राम यांना तक्रारदार यांचेसोबत असलेल्या पंचावरती संशय आल्याने त्यांनी त्यांना केबीन बाहेर थांबण्यास सांगितले. सदरवेळी तक्रारदार श्रीमती कापसे व लोकसेवक अविनाश मेश्राम यांच्यात झालेले संभाषणात, '' आम्ही, आम्हाला एवढा एक्सपिरीयन्स आहे मी तुम्हाला सांगतो,...आम्ही खुप दिवसापासुन डयुटी करतोय ,...आम्ही अॅन्टी करप्शनच्या पण डयुटया केलेल्या आहेत,... कसं काय लावायचं ते, कसे कसे ट्रॅप होतात आम्हाला माहिती आहे,....असे शब्द वापरूनच ट्रॅप केले जातात, .....आणि तुम्ही घाबरत आहेत त्याच्यावरून मला पुर्ण डाऊट आहे, ....नाही, तरी पण आज, ....नाही नाही नाही आज तुम्ही जास्तच भित भित, घाबरलेल्या दिसतात, .... तस नाही ना ते, .... साहेबांना पण डाऊट आहे, .....मला पण, ....कारण तुमच्या सीए मध्येच गायब झाल्या'' या संभाषणावरून लोकसेवक अविनाश मेश्राम यांना तक्रारदार यांच्या बोलण्यातून व वागण्यावरून त्या घाबरल्याबाबत व काहीतरी गडबड असल्याचा संशय आला असल्याने, लोकसेवक यांनी सदरवेळी लाच रक्कम घेण्यास टाळाटाळ केली असल्याचे दिसून येत आहे.

त्यानंतर दि.०५/०१/२०२६ रोजी पुन्हा लोकसेवक मेश्राम यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता, लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांनी तक्रारदार यांच्या फोन कॉलला कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांनी तक्रारदार श्रीमती कापसे यांना प्रत्यक्षभेटी करीता कोणताही संपर्क केला नाही. त्यामुळे लोकसेवक यांना संशय आल्याने ते तक्रारदार यांचे पुर्तता झालेल्या कामासाठी लाच स्विकारण्याची शक्यता नाही.

तरी सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्रीमती ममता कापसे व लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांच्यामध्ये प्रत्यक्ष भेटीदरम्यान झालेल्या संभाषणावरुन लोकसेवक श्री अविनाश मेश्राम यांच्या जीएसटी भवन, बीकेसी, मुंबई या कार्यालयात तक्रारदार श्रीमती कापसे या अकाउंट मॅनेजर म्हणुन काम

पोनि. सुषमा खोत यांचा दिनांक २४/०३/२०२६ रोजीचा जबाब पुढे चालु....

करीत असलेल्या त्यांच्या कॅलसांयटिफिक इंडिया, प्रायव्हेट लिमिटेड, या कंपनीच्या वार्षिक जीएसटी परतावा फाईलची पुर्तता करून दिल्याचे अनुषंगाने तक्रारदार श्रीमती ममता कापसे यांच्याकडे सुरवातीला १ लाख रुपये लाचेची मागणी करण्यात आली होती, परंतु दिनांक १९/१२/२०२५ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री मेश्राम यांनी रक्कम ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली व तडजोडीअंती रक्कम ३०,०००/- रूपयाची लाच स्विकारण्याचे मान्य करुन संशय आल्याने सदरची रक्कम स्विकारली नाही. परंतु केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये मेश्राम यांनी रू. ३०,०००/- ची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने माझी सरकारतर्फे लोकसेवक श्री. अविनाश मेश्राम, पद -राज्यकर निरीक्षक यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(संदीप पाटील)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

तक्रार दिली

सुषमा खोत
पोलीस निरीक्षक
लाप्रवि मुंबई

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तक्रारदाराने दिलेल्या लेखी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पडताळणी करून निष्पन्न झालेल्या बाबीवरून गुन्हा दाखल.

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..................

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page. नमुद गुन्ह्यातील तक्रारदार नामे श्रीमती ममता कापसे या अकाउंट मॅनेजर म्हणून काम करत असलेल्या त्यांच्या कॅमसायंटिफिक इंडिया प्रा. लि. या कंपनीचा वार्षिक जीएसटी परतावा फाईलची पूर्तता करून दिल्याचे अनुषंगाने तक्रारदार कापसे यांच्याकडे सुरुवातीला 1 लाख रुपये लाचेची मागणी करण्यात आली होती. परंतु दि. 19.12.25 रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाई मध्ये आलोसे अविनाश मेश्राम यांनी रक्कम 50,000/- रुपये लाचेची मागणी केली व तडजोडी अंती रक्कम 30,000/- रुपयांची लाच स्वीकारण्याचे मान्य करून संशय आल्याने सदरची रक्कम स्वीकारली नाही. परंतु केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये मेश्राम यांनी रु. 30,000/-ची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने

13. **केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या सरकारतर्फे फिर्याद नोंद.

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्री. संदिप पाटील पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................. जिल्हा .................. राज्य ..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..................

(3) Transferred to P. S. ..................
District .................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name संदिप पाटील

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ..................

Posting

Code No. of I. O. ..................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..................
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report